क्रमांक: २२४३ /क-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १० फेब्रुवारी, २०२०

**संदर्भ : १) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.१२१४३/क-१, दिनांक १९ मार्च, २०१६.**
**२) या सचिवालयाचे ज्ञापन क्र.१९६१९/क१, दिनांक १९ जुलै, २०१८.**
**३) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६.**

**:: ज्ञापन::**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील विविध कक्षांत आवश्यक ती साधनसामुग्री खरेदी करताना त्यात एकसुत्रीपणा राहण्याच्या दृष्टीने तसेच खरेदी प्रक्रिया पारदर्शक (Transparent) व नियमानुकूल राहून जलदगतीने पूर्ण होण्याच्या उद्देशाने संदर्भ क्र. १ वरील ज्ञापनान्वये "खरेदी समिती (Purchase Committee)" गठीत करण्यात आलेली आहे.

या समितीची रचना उपरोक्त संदर्भ क्र. ३ वरील शासन निर्णयात नमूद रचनेच्या धर्तीवर करण्यात आलेली आहे. या ज्ञापनान्वये समितीच्या रचनेत अंशत: बदल करण्यात येत असून समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.अ.शं.महाजन, विशेष कार्य अधिकारी | अध्यक्ष |
| २. | श्री.वि.गो.आठवले, उप सचिव | सदस्य |
| ३. | उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी | सदस्य |
| ४. | श्री.सं.ना.पराडकर, अवर सचिव | सदस्य |
| ५. | श्री.र.ग.जगदाळे, अवर सचिव | सदस्य |
| ६. | श्री.क.तु.डोके, कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी | निमंत्रित |
| ७. | श्री. अ. अ. सर्वणकर, पध्दती विश्लेषक | निमंत्रित |

या सचिवालयाच्या कार्यालयीन खरेदीकरीता उपरोक्तप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या समितीस सहाय्य करण्याकरीता "ग-१" कक्षाचे श्री. म.बा. भडेकर, कक्ष अधिकारी व "ग-२" कक्षाचे श्री.वि.वि.काळे, सहायक मालमत्ता व्यवस्थापक यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

उपरोक्त "खरेदी समिती (Purchase committee)" संदर्भ क्र. ३ वरील शासन निर्णयातील कार्यपध्दती तसेच वित्तीय नियम विचारात घेवून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर ५ दिवसांच्या कालावधीत प्रस्तावांची छाननी करुन अभिप्रायासह प्रस्ताव संबंधित कक्षाकडे पाठवतील.

खरेदी समितीच्या अभिप्रायानुसार समितीच्या शिफारशी संबंधित कक्ष खालील प्रपत्रात सचिव यांच्याकडे पाठवतील. प्रस्तावास योग्यत्या सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत मान्यता मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेसंदर्भातील कार्यवाही "क-१" कक्षामार्फत प्रस्ताव प्राप्त झाल्यापासून ७ दिवसात करण्यात येईल.

**प्रपत्र**

| अ.क्र. | संबंधीत कक्षाने खरेदी समितीकडे प्रस्ताव पाठवल्याचा दिनांक | खरेदी समितीने प्रस्ताव विचारात घेतल्याचा दिनांक | शिफारशीसह समितीने संबंधित कक्षाकडे प्रस्ताव पाठविल्याचा दिनांक | सचिवांकडे संबंधित कक्षाने शिफारशीसह प्रस्ताव पाठविल्याचा दिनांक | प्रस्तावास सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिल्याचा दिनांक | क-१ कक्षाने निधी उपलब्ध करणे/न करणे याबाबत केलेल्या कार्यवाहीचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |

तसेच प्रस्तावाची सद्य:स्थिती संबंधित कक्षाने वेगळ्या टिपणीद्वारे सचिव यांना दर ८ दिवसाने अवगत करणे बंधनकारक राहील. सचिव याबाबत मा.पिठासीन अधिकारी यांना तातडीने अवगत करतील.

**आदेशानुसार**

**(जयवंत राणे)**
अवर सचिव (समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

१. श्री. अ. शं. महाजन, विशेष कार्य अधिकारी
२. श्री.वि.गो.आठवले, उप सचिव
३. उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी
४. श्री.सं. ना. पराडकर, अवर सचिव
५. श्री.र.ग.जगदाळे, अवर सचिव
६. श्री.क.तु. डोके, कक्ष अधिकारी तथा आहरण व संवितरण अधिकारी
७. श्री.अ.अ.सर्वणकर, पध्दती विश्लेषक

३/-

प्रतिलिपी :

१) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) या सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

६) सार्वजनिक बांधकाम विभाग (स्थापत्य व विद्युत) यांचे अधिकारी, विधान भवन, मुंबई.

७) निवडसूची.